# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०

फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.म.वि. 8087. दिनांक:–2 /11 / २०१७.

C/ 423

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
संस्थेअंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय:– महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत.

संदर्भ:– शासनाचे पत्र क्र. संकीर्ण–२०१७/प्र.क्र./५४०/विशि–३, दिनांक २७–१०–२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयाचे संदर्भीत पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अलीकडच्या काळात वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर होणारे रॅगिंग, दहशत, लैगिंक शोषण इ. बाबी निदर्शनास येत असल्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता पहाणे व पुरेशा उपाययोजना करणे ही बाब शैक्षणिक संस्थेच्या कार्यकक्षेतील असून महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून महाविद्यालय परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेत ओळखपत्र लावणे बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे इ. उपाययोजना अत्यंत गरजेचे आहे असे शासनाने कळविले आहे.

तरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपायसोजना करण्याकरिता शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तसेच विद्यापीठासही पाठवावा. आपल्या सुलभ संदर्भाकरिता वरिल पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

कळावे.

आपला,

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव (अति.कार्य)

सहपत्रे:– वरिलप्रमाणे

महाराष्ट्र शासन

इ-मेल व्दारे

क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ५४०/विशि ३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७/१०/२०१७.

आवक क्र. 2126 दिनांक 27/10/17
जावक क्र. 2126 दिनांक 30/10/17

प्रति,
कुलगुरु/कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

883 27/10/17

विषय :- राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अलीकडच्या काळात वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर होणारे रॅगिंग, दहशत, लैंगिक शोषण इ. बाबी निदर्शनास येत आहेत.

२. विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता पहाणे व त्यानुषंगाने पुरेशा उपाययोजना करणे ही बाब संबंधित शैक्षणिक संस्थेच्या कार्यकक्षेतील असली तरीही संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक संस्थेच्या परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेत ओळखपत्र लावणे बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे इ. उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

३. सबब, आपणास विनंती करण्यात येते की, आपण प्रस्तुत प्रकरणी व्यक्तीगत लक्ष घालून आपल्या विद्यापीठातील व आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करुन केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास १५ दिवसाच्या आत अवगत करावे, ही विनंती. सदर प्रकरणाबाबतचा अहवाल मा. राज्यमंत्री महोदयांना सादर करावयाचा असल्याने आपल्याकडून प्राधान्याने कार्यवाही अपेक्षित आहे.

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

3199 31/10

प्रत :

संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती.

DR GA / Dir. Student Dev.
DR Cllge /

पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव

कुलसचिव